अस्थायी कर्मचा-यांना स्थायीत्व
प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे बाबत.

जिल्हा परिषद अहमदनगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश जा.क्र.साप्रवि-२/ग्रापं-१/२०२४/६१२
अहमदनगर दिनांक १३/०५/२०२४

वाचा :- १. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र एसआरव्ही/१०७५/१० दि.१९/९/१९७५

२. शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र स्थाप्रप-१४१४/ (प्र.क्र. ७३/१४)/ १३-अ दि.११ सप्टेंबर २०१४.

३.या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. साप्रवि-२/ग्रापं-१८२२/२०२३ दि.२७/१२/२०२३

४. [redacted].गटविकास अधिकारी पं.स.पारनेर यांचा प्रस्ताव जा.क्र.प्रशा/आस्था-२/३२०/२०२४ दि.१५/०४/२०२४.

महाराष्ट्र शासनाचे संदर्भीय निर्णयात / परिपत्रकात नमुद केलेनुसार प्रत्येक अस्थायी शासकीय कर्मचा-यास /अधिका-यास स्थायित्व प्रमाणपत्र प्रथम पदावरील नियुक्तीच्या संदर्भात देणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय/परिपत्रके अधिक्रमित करुन त्यामधील सुचनांचा एकत्रित विचार करुन स्थायित्व प्रमाणपत्र देण्यासंदर्भात पुढील सुचना दिलेल्या आहेत.

प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षाची नियमित सेवा पूर्ण करणा-या व पुढील शर्तीची पूर्तता करीत असलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांना स्थायीत्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे त्यानुसार जिल्हा परिषदे अंतर्गत गट क श्व गट ड मधील पात्र अस्थायी कर्मचा-यांच्या बाबतीत संबधीत कार्यालय प्रमुखाने स्थायित्व प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. त्याबाबत खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१.कर्मचा-यांची नियुक्ती सेवा प्रवेश नियमानुसार व विहित पध्दतीने होणे,

२.कर्मचारी सेवेस पात्र असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र असणे व कर्मचा-याने सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परिक्षा उत्तीर्ण होणे,

३.कर्मचा-याचा सेवाभिलेख (उदा. गोपीनीय अहवाल, उपस्थिती, सचोटी इ.) चांगला असणे.

स्थायित्व प्रमाणपत्राचा नमुना

याद्वारे प्रमाणित करण्यात येते की उक्त शासन सामान्य प्रशासन विभागाकडिल परिपत्रक दि.११ सप्टेंबर २०१४ मधील सुचना क्र.२ येथे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती खाली नमुद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत पूर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी आवश्यक त्या सर्व प्रयोजनार्थ स्थायी शासकीय कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास पात्र आहेत.

| अ क्र | शासकीय कर्मचा-यांचे नांव | कर्मचारी यांचे सध्याचे पदनाम व कार्यालय | ज्या पदावर स्तंभ क्र १ मधील कर्मचा-यास स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे पदनाम | कोणत्या दिनांकापासून स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात आले. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ३ | ४ |
| १ | निलेश शंकरराव भालेकर | ग्रामसेवक - पं.स.पारनेर | ग्रामसेवक | १३/०७/२०२३ |
| २ | ऑल्विन विल्सन शेक्सपिअर | | | ०३/०८/२०२३ |
| ३ | गणेश मधुकर घुले | | | १४/१०/२०२२ |

वरील प्रमाणे कर्मचा-यांना पुर्वीच्या पदावर ३ वर्पाची नियमीत सेवा पुर्ण करणा-या पात्र अस्थायी कर्मचा-यांना व वर नमुद केलेल्या अटी पूर्ण करणा-या कर्मचा-यांना स्थायित्वाचे प्रमाणपत्र देणेत येत आहे. सदर प्रमाणपत्राची संवंधीत कर्मचा-याचे मुळ सेवा पुस्तकात नोंद घेणेपुर्वी उक्त अटी व शर्तीची पुर्तता संवंधीत कर्मचारी करीत असल्यावावतची शहानिशा कार्यालय प्रमुख यांनी संवंधीत कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकावरुन करुन घेणेत यावी.व त्यानंतरच सदर प्रमाणपत्राची नोंद घेणेत यावी.केलेल्या कार्यवाहीचा अहवाल इकडे सादर करावा.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिपदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र२०२४०७२३०६००८६ असा आहे.

Signed by
Dadabhau Namdeo Gunjal
Date: 23-07-2024 16:32:07
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति, सर्व संवंधित कर्मचारी

द्वारा - गटविकास अधिकारी,पंचायत समिती पारनेर.

प्रत - गटविकास अधिकारी,संवधीत पंचायत समिती पारनेर, जि. अहमदनगर

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि प अहमदनगर